RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ९९(२)] शुक्रवार, जुलै १४, २०२३/आषाढ २३, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नविन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक १४ जुलै, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११.**

क्रमांक मपप-०९२२/प्र.क्र.५३/अधिनियम.—ज्याअर्थी, महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ (२०१६ चा महा. ६) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) च्या कलम ५(१) नुसार महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र परावैद्यक परिषद (यात यापुढे जीचा निर्देश “उक्त परिषद” असा करण्यात आला आहे) शासन अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक १८ ऑक्टोबर २०१७ अन्वये गठीत केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेचा कालावधी अधिसूचनेच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीसाठी असल्याने परिषदेच्या सदस्यांचा कालावधी दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी संपुष्टात आला आहे;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाचा The National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) Act, 2021 (यात यापुढे ज्याचा निर्देश “केंद्र शासनाचा अधिनियम” असा करण्यात आला आहे) दिनांक २५ मे २०२१ पासून अंमलात आला आहे ; आणि राज्यात त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर केंद्र शासनाच्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या परिणाम स्वरूप राज्याचा उक्त अधिनियम परिणामक्षम राहणार नसल्याने तो पूर्णपणे परत (Repeal back) घ्यावा लागणार आहे आणि सदर केंद्र शासनाच्या अधिनियमाची अंमलबजावणी होईपर्यंत महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे कामकाज सुरू ठेवणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर उक्त परिषदेची नव्याने निवडणूक घेणे सुयोग्य ठरणार नसल्याने केंद्र शासनाच्या अधिनियमाची अंमलबजावणी होईपर्यंत उक्त परिषदेवर प्रशासकाची नियुक्ती करावी लागेल ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेचे कामकाज अंतरिम कालावधीसाठी सुरळीत चालावे यासाठी शासनाने श्री. उमेशचंद्र प्रकाश सोनार यांची उक्त परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती दिनांक १० मे २०२३ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये करण्यात आली होती. तथापि श्री. सोनार यांच्या विरुद्ध दप्तर दिरंगाई केल्याच्या तक्रारी असल्याने त्यांची प्रशासक पदी केलेली नियुक्ती रद्द करून श्री. सतीश काशिनाथ नक्षिने, (Operated Clinical Laboratory), मारोती वार्ड नं. २, हिंगणघाट, वर्धा यांची नियुक्ती करण्याचे शासनाने ठरविले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ पूर्णपणे परत घेण्यात येईपर्यंत उक्त अधिनियमाच्या कलम ३८ (२) (ख) नुसार शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून परिषदेचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी परिषदेवर श्री. सतीश काशिनाथ नक्षिने, यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वैशाली सुळे,**
शासनाच्या उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.